| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०३.०१.२०१७ |
| नोंदविल्याचा दिनांक | : | ०३.०१.२०१७ |
| निकाल दिनांक | : | १३.०७.२०२६ |
| कालावधी | : | ०९व.०६म.१०दि |

**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, न्यायालय क्र. १, पाथर्डी यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी – रविकिरण सपाटे)

**नियमित फौजदारी खटला क्र. ०८/२०१७**

**निशाणी क्रमांक – १२३**

गुन्हा नोंद क्र.४८३/२०१६, पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहमदनगर

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र शासन,**
मार्फत – पोलीस निरीक्षक,
पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहमदनगर

प्रतिनिधीत्व : सहाय्यक सरकारी वकील श्री. ए. बी. विधाटे.

**आरोपी**

१. **आजीनाथ निवृत्ती खेडकर,**
वय–४० वर्षे, धंदा– शेती

२. **सुर्यभान निवृत्ती खेडकर,**
वय – ६३ वर्ष, धंदा – शेती,

३. **निवृत्ती मारुती खेडकर,**
वय – ६६ वर्ष, धंदा –शेती,

४. **संतोष सुर्यभान खेडकर,**
वय – ३३ वर्ष, धंदा –शेती,

५. **अन्साबाई निवृत्ती खेडकर (मयत)**

६. **सुनिता आजीनाथ खेडकर,**
वय – ३३ वर्ष, धंदा –शेती,

७. **द्रोपदाबाई सुर्यभान खेडकर,**
वय – ६० वर्ष, धंदा –शेती,
सर्व रा. मुंगुसवाडे ता. पाथर्डी जि. अहमदनगर.

प्रतिनिधीत्व : विधीज्ञ श्री. आर. एन. खेडकर

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २५.१०.२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २६.१०.२०१६ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०३.०१.२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | ०७.०२.२०२० |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :– | १९.०९.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १३.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | –– |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आजीनाथ निवृत्ती खेडकर | निरंक | ०७.०२.२०२० | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | सुर्यभान निवृत्ती खेडकर | | | | | | |
| ३. | निवृत्ती मारुती खेडकर | | | | | | |
| ४. | संतोष सुर्यभान खेडकर | | | | | | |
| ६. | सुनिता आजीनाथ खेडकर | | | | | | |
| ७. | द्रोपदाबाई सुर्यभान खेडकर | | | | | | |

## न्यायनिर्णय
## (पारित दिनांक १३ जुलै, २०२६)

१. आरोपींविरुध्द पाथर्डी पोलीस ठाणे गु.र.नं.४८३/२०१६, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ खालील गुन्हयांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण १९ अन्वये वॉरंट खटल्याप्रमाणे संपरिक्षा घेण्यात आली.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीगत अशी की**,

फिर्यादी सुलाबाई सुर्यभान खेडकर यांनी दि. २६.१०.२०१६ रोजी पाथर्डी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दि. २५.१०.२०१६ रोजी रात्री ८.०० वाजताचे सुमारास तिचा मुलगा सोमनाथ हा त्यांचे गावात देवदर्शनासाठी गेला होता व ती व तिचे पती घरीच होते. रात्री ९.०० वा. चे सुमारास तिला तिचे मुलाला आरोपी आजिनाथ खेडकर हा मुंगुसवाडे गावाचे एकनाथवाडीकडे जाणारे कमानीजवळ रोडवर दारु पिवून शिवीगाळ करतो असे समजले. ती व तिचे पती सदर ठिकाणी गेले व पाहिले असता आजिनाथ निवृत्ती खेडकर हा त्यांचा मुलास शिवीगाळ करुन मारहाण करीत होता. ती व

तिचे पती भांडणे सोडवित असताना त्या ठिकाणी इतर सर्व आरोपी आले व यांना सोडु नका असे म्हणून शिवीगाळ करु लागले. त्यावेळी ते आरोपींना समजावून सांगत असताना आजिनाथ याने त्याचे हातातील गजाने फिर्यादीला मारहाण केली. सदर मारहाणीत तिच्या डावे पायाचे मांडीस, पाठीस मुक्का मार लागला आहे. त्यावेळी निवृत्ती खेडकर याने तिचे केसांना धरुन ओढले. तिचे पती सोडविणेस आले असता त्यांना निवृत्ती व सुर्यभान यांनी लाथाबुक्क्यांनी बरगडीत मारहाण केली. अन्साबाई हिने तिचे हात धरुन सुनिता, द्रोपदाबाई यांनी शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सदरची भांडणे पुतण्या सुधाकर खेडकर याने सोडविली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन पाथर्डी पोलीस ठाणे गु.र.नं.४८३/२०१६, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो. हे. कॉ. आर. के. रांझणे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला आणि तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.२३ कडे दोषारोप ठेवला आहे. दोषारोपातील मजकुर आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून दाखविला असता, आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षा घेण्याची मागणी केली. दोषारोप निश्चीतीनंतर आरोपी क्र. ०५ अन्साबाई निवृत्ती खेडकर मयत झाल्याने निशाणी क्र. ०१ वरील दि. १८.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये तिचेविरुध्द खटला उपशमन करण्यात आला.

५. तसेच, आरोपींचे फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम ३१३(१) (ब) चे निवेदन निशाणी ११३ ते ११८ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपींनी जमिनीवरुन पुर्वी वाद असल्याने व त्यांना त्रास देणेसाठी खोटी केस दाखल केल्याचा बचाव घेतला आहे.

६. खटला निर्णित करणेसाठी माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. २५.१०.२०१६ रोजी २१.०० वाजेच्या सुमारास मौजे मुंगुसवाडे शिवारातील रोडवरील कमानीजवळ, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर येथे आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साधण्याकरीता बेकायदेशीर जमाव बनून त्या जमावाचे घटक झाले, हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. | वर नमुद वेळेस व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साधण्याकरीता बेकायदेशीर जमाव करुन हिंसाचार करुन दंगा केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का? | नाही. |
| ३. | वर नमुद वेळेस व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साधण्याकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक होवून प्राणघातक हत्यारानिशी सज्ज् होवून दंगा केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ४. | वर नमुद वेळेस व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साधण्याकरीता फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ५. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साधण्याकरीता फिर्यादीच्या हातुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा एखादा फौजदारीपात्र गुन्हा घडावा या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करुन अपमानित केले, हे अभियोगपक्ष शाबीत करतो | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | का? | |
| ६. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साधण्याकरीता फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा केला व जिवे मारण्याची धमकी दिली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ७. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## – का र ण मि मां सा –:

### मुद्दे क्र. १ ते ६ करीता –

७. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी सलंग्न असल्याने विवेचन व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विश्लेषण एकत्रीत करण्यात येत आहे.

८. सा.क्र.१ फिर्यादी सुलाबाई सुर्यभान खेडकर यांनी सरतपासात असे अभिकथन केले आहे की, आरोपी हे शेजारी राहत असल्याने ती त्यांना ओळखते. घटना दिनांक २५.१०.२०१६ रोजी रात्री ०९.०० सुमारास एकनाथवाडी च्या कमानीजवळ रोडवरती घडली होती. घटनेवेळी तिचा मुलगा देवदर्शनाकरिता जात होता. तिला व तिचे पतीला घरामध्ये कल्ला ऐकू आला म्हणून ती आणि तिचे पती कमानी जवळ गेले त्यावेळेस आरोपी अजिनाथ हा तिच्या मुलाला शिवीगाळ करीत होता. त्यांनी आरोपीला सोडा सोडा असे म्हणालो असता आरोपीने त्यांना देखील शिवीगाळ केली. त्यावेळी त्या ठिकाणी निवृत्ती, सूर्यभान, संतोष, अनुसयाबाई, सुनिता व द्रौपदा हे सर्वजण त्या ठिकाणी आले. त्यानंतर आजिनाथ याने तिच्या डाव्या मांडीवर आणि पाठीवर लोखंडी गजाने मारहाण केली. निवृत्ती याने तिचा बुचडा धरला, सूर्यभान याने तिची गचांडी धरली, अनुसयाबाई हिने तिचे हात धरले, त्यावेळी सुनीताबाई आणि द्रौपदाबाई यांनी हाणाहाणा यांना जीवे मारा असे म्हणाले. त्यावेळी त्यांचा पुतण्या आला व त्याने भांडण सोडविले. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद नि क्र. ७९ दिली. पोलिसांनी त्यांना

दवाखान्यात पाठवले. आरोपीने ज्या गजाने मारहाण केली तो लोखंडी गज एम आर क्रमांक २४/२०२४ आर्टिकल क्रमांक– अ तिने ओळखला. पोलीस त्यानंतर आले होते तिने पोलिसांना घटनास्थळ दाखविले.

९. सा. क्र. ०१ सुलाबाई यांनी उलटतपासामध्ये आरोपी व त्यांची जमिन शेजारी असल्याचे तिने मान्य केले आहे परंतु, सदर जमिनीच्या रस्त्याच्या व बांधाच्या कारणावरुन आरोपी व त्यांच्यामध्ये वाद असल्याचे नाकारले आहे. आरोपी क्र. ५ हिने तिच्या दिराची जमिन खरेदी केली आहे व तिच्या जमिनीमधून त्यांना त्यांच्या शेतात जावे लागते. परंतु जमिनीच्या कारणावरुन संगनमत करुन खोटी फिर्याद दाखल केल्याचे तिने नाकारले आहे.

१०. सा. क्र. ०२ सुर्यभान विठोबा खेडकर यांनी सरतपासामध्ये असे अभिकथन केले आहे की, घटना दि. २५.१०.२०१६ रोजी रात्री ८.०० चे सुमारास, मुंगुसवाडे ते एकनाथवाडी जाणारे रोडवरील कमानीजवळ घडली. घटनेवेळी ते घरी होते. घटनेवेळी त्यांचा मुलगा सोमनाथ गावात देवदर्शनासाठी गेला होता. मुलगा बराच वेळ घरी आला नाही म्हणून ते गावात गेले. त्यांना कलमा ऐकू आला. म्हणून ते व त्यांची पत्नी कमाणीजवळ गेले. कमाणीजवळ सोमनाथ व आरोपी आजिनाथ होते. ते एकमेकांना शिवीगाळ करत होते. आरोपी आजिनाथ याने दारु पिवून सोमनाथ याला शिवीगाळ व हाणमार करत होता. आजिनाथच्या हातात लोखंडी गज होता. त्यांनी आजिनाथला समजावून सांगण्यासाठी गेले. त्यावेळी आरोपी क्र. २ ते ७ त्या ठिकाणी शिवीगाळ करत आले. त्यांनी त्यांना पुन्हा समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी निवृत्ती याने त्यांच्या पत्नीच्या केसाला धरले. त्यावेळी आजिनाथ याने गजाने त्यांची पत्नी सुलाबाई हिला मारले. त्यानंतर ते सोडवायला गेले. त्यावेळी त्यांना निवृत्ती आणि सुर्यभान यांनी गचांडी धरुन खाली पाडले. त्यानंतर सुधाकर दिनकर खेडकर त्या ठिकाणी सोडवायाला आला त्यावेळी आरोपी आजिनाथ याने जिवे मारु अशी धमकी दिली. तसेच सदर मारहाणीमध्ये द्रोपदी, सुनिता यांनी त्यांची पत्नी सुलाबाई हिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

त्यानंतर ते व त्यांची पत्नी पाथर्डी पोलिस स्टेशनला आले व त्यानंतर सरकारी दवाखान्यात गेले. सरकारी दवाखान्यामध्ये उपचार घेतले. ज्या गजाने त्यांना मारहाण केली तो गज आर्टीकल अ त्यांनी ओळखला. पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी करुन त्यांचा जबाब नोंदविला होता.

११. सा. क्र. ०२ सुर्यभान यांनी उलटतपासामध्ये आरोपी व त्यांच्यामध्ये शेतजमीनीच्या पाच गुंठे क्षेत्रावरुन वाद असल्याचे नाकारले आहे. त्यांचे घर घटनास्थळापासून साधारण ५०० मीटर अंतरावरती आहे. त्यांनी पोलिसांना जबाब देताना ''घटना मुंगुसवाडे ते एकनाथवाडी जाणारे रोडवरील कमानीजवळ घडली, आम्हाला कलमा ऐकु आला, आम्ही आरोपी आजिनाथ व आरोपी क्र. ०२ ते ०७ यांना समजावून सांगण्यासाठी गेलो व आरोपी क्र. ०२ ते ०७ तेथे शिवीगाळ करत असल्याचे'’ सांगितले होते परंतु तसा मजकूर त्यांच्या जबाबमध्ये नसल्याचे मान्य केले आहे. तसा मजकुर का नमुद केला नाही याचे कारण ते सांगू शकत नाही.

१२. सा. क्र. ०३ सुधाकर दिनकर खेडकर यांनी सरतपासामध्ये अभिकथन केले आहे की, फिर्यादी त्यांची चुलती आहे व आरोपी भावकीतील असल्याने ते त्यांना ओळखतात. घटना कधी, कोठे व काय घडली हे त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने सरकारी वकिलांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु अभियोग पक्षास पुरक असा पुरावा पटलावरती आला नाही.

१३. सा. क्र. ०४ सुदाम गिन्यानदेव खेडकर, घटनास्थळ पंच यांनी सरतपासामध्ये अभिकथन केले आहे की, त्यांना पोलिसांनी पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते, तसेच त्यांचे समक्ष पोलिसांनी कोणताही पंचनामा केला नाही. परंतु त्याची सही घेतली होती. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने सरकारी वकिलांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु अभियोग पक्षास पुरक असा पुरावा पटलावरती आला नाही.

१४. सा. क्र. ०५ रेवन्नाथ कारभारी रांझणे यांनी सरतपासामध्ये असे अभिकथन केले आहे की, सन २०१६ साली ते पाथर्डी पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत असताना दिनांक २६/१०/२०१६ रोजी दिवशी त्यांच्याकडे गु.र.क्र. ४८३/२०१६ भा.दं.वी.कलम १४३, १४७, १४८, ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह १४९ चा तपास देण्यात आला होता. सदर गुन्हयाची फिर्याद ठाणे अंमलदार असल्याने त्यांनीच नोंदवुन घेतली होती. त्यानंतर दुस–या दिवशी घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा नि क्र. १०७ तयार केला. त्यानंतर साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. साक्षीदार सुधाकर दिनकर खेडकर याचे जबाबातील साक्षांकित भाग अ नि १०८ त्यांच्या सांगणेप्रमाणे नोंदविला होता. त्यानंतर त्यांनी गुन्हयातील आरोपींना हजर राहण्याबाबत नोटीस दिली. त्यानंतर आरोपींनी गुन्हयात वापरलेला गज हजर केल्याने तो दोन पंचांसमक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा नि १०९ तयार केला. जप्त लोखंडी गज हा मोहरीर यांचे ताब्यात देवून मुद्देमाल पावती तयार केली. जखमिंचे वैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांनी त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

१५. सा. क्र. ०५ रांझणे यांनी उलटतपासामध्ये घटनास्थळ व जप्ती पंचनामे हे त्यांनी खोटे तयार केल्याचे तसेच साक्षीदार सुधाकर दिनकर खेडकर याचे जबाबातील निशाणी १०८ त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नसल्याचे नाकारले आहे.

१६. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादी व जखमी तसेच तपासी अधिकारी यांनी दिलेल्या पुराव्यावरुन आरोपींविरुध्दचे आरोपी शाबीत होत असल्याचा युक्तीवाद केला. उलटपक्षी आरोपींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, फिर्यादीने दिलेला पुरावा हा विश्वासार्ह पुरावा नाही. अभियोग पक्ष हे घटनेतील महत्वाचा साक्षीदार फिर्यादीचा मुलगा व कथित मारहाणीमध्ये आरोपींना झालेल्या जखमा शाबित करण्यास असफल ठरला आहे.

१७. अभियोग पक्षास घटनास्थळ पंच सा. क्र. ०४ सुदाम याने अभियोग पक्षास

पुरक साक्ष दिलेली नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा हा सिध्द झालेला नाही. घटनेतील कथित साक्षीदार क्र. ०३ सुधाकर याने देखिल अभियोग पक्षास पुरक साक्ष दिलेली नाही.

१८. फिर्यादीने दिलेला पुरावा तसेच फिर्याद यावरुन आरोपी हे फिर्यादीचा मुलगा सोमनाथ याला मारहाण करीत होते परंतु, अभियोग पक्ष सोमनाथ याला तपासण्यास अपयशी ठरले आहे. सा. क्र. ०२ सुर्यभान याने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, घटनास्थळापासून त्यांचे घर ५०० मीटर अंतरावरती आहे. त्यामुळे ५०० मीटर अंतरावरून भांडणाचा कल्ला ऐकु येणे ही बाब रास्त वाटत नाही. तसेच फिर्यादी व तिचे पती आणि मुलगा सोमनाथ यांना कथित झालेल्या जखमांबाबत कोणताही पुरावा पटलावरती आलेला नाही. आरोपी यांच्याकडुन लोखंडी गज आर्टीकल अ जप्त झाला याबाबत देखिल कोणता पुरावा पटलावरती आलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपी यांनी बेकायदेशीर जमाव करुन हत्यारानिशी दंगा केला, फिर्यादी, तिचा मुलगा सोमनाथ व पती सुर्यभान यांना ईच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व अपमानित करुन प्रक्षोभित केले व जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी रास्तपणे शाबित करण्यास अपयशी ठरले आहे. त्यामुळे मी मुद्दे क्र. १ ते ६ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ७ करीता–**

१९. माझे वरील विवेचनावरुन तसेच मुद्दे क्र.१ ते ६ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असल्याने अभियोग पक्ष आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये निश्चित केलेले दोषारोप सर्व संशयाच्या पलीकडे जावून शाबीत करण्यास अपयशी ठरले आहे. जप्त मुद्देमाल एक लोखंडी गज २ फुट लांबीचा हा मुल्यहीन असल्याने तो अपील कालावधीनंतर नष्ट करणे योग्य व उचित होईल. अशा परिस्थितीत आरोपींना संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त करणे योग्य व उचित होईल. करीता मी मुद्दा क्र. ७ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ ते ४, ६ व ७ यांची भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ नुसार शिक्षेस पात्र गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक लोखंडी गज २ फुट लांबीचा मुल्यहीन असल्याने तो अपील कालावधीनंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ प्रमाणे नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा स्वतंत्र जामीन सादर करावा. सदरचे बंधपत्र हे पुढील सहा महिन्यांकरता वैध राहिल.

(निकाल खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.07.13 17:08:22 +0530

पाथर्डी.

दिनांक – १३/०७/२०२६

**(रविकिरण सपाटे),**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

पाथर्डी.

## भाग–क

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सुलाबाई सुर्यभान खेडकर | फिर्यादी | निशाणी ७८ |
| २. | सुर्यभान विठोबा खेडकर | साक्षीदार | निशाणी ८९ |
| ३. | सुधाकर दिनकर खेडकर | साक्षीदार | निशाणी ९१ |
| ४. | सुदाम गिन्यानदेव खेडकर | घटनास्थळ पंच | निशाणी ९२ |
| ५. | रेवन्नाथ कारभारी रांझणे | तपासी अंमलदार | निशाणी १०६ |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी ७९/साक्षीदार क्र.१ | फिर्याद |
| २. | निशाणी १०७/साक्षीदार क्र.५ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | निशाणी१०८/साक्षीदार क्र. ५ | साक्षीदार सुधाकर दिनकर खेडकर यांचे जबाबातील साक्षांकित भाग अ |
| ४. | निशाणी १०९/साक्षीदार क्र.५ | जप्ती पंचनामा |

## भाग–ड

**महत्त्वाच्या वस्तु –**

| अ.क्र. | आर्टिकल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | आर्टीकल अ | एक लोखंडी गज २ फुट लांबीचा |

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.07.13 17:08:27 +0530

पाथर्डी.

दिनांक – १३/०७/२०२६

**(रविकिरण सपाटे),**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पाथर्डी.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | रोहिणी आमटे |
| न्यायालयाचे नाव | : | रविकिरण सपाटे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाथर्डी |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १३/०७/२०२६ |